




दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : ३२७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०८ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# महाराष्ट्रात पाऊस ओसरणार ; हवामान विभागाचा नवा अंदाज

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने अक्षरशः पावसाने धुमाकूळ घातलेला बघायला मिळत आहे. मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, पुणे या जिल्ह्यांमध्ये पावसाचा प्रकोप बघायला मिळाला. हवामान विभागाकडून नाशिक जिल्ह्याला आज पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. त्यानुसार, नाशिकमध्ये पाऊस पडत आहे. पण वाऱ्याची दिशा बदलल्यामुळे नाशिकवरचं ढगफुटीचं संकट हे अकोले आणि पुढे सुरतच्या दिशेला ढकललं गेलं आहे. पुण्यात घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तसेच हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आता हळूहळू राज्यातील पाऊस ओसरणार आहे. केवळ विदर्भात पाऊस सक्रीय राहण्याची शक्यता आहे.

**पालघरला आज रेड तर उद्या यलो अलर्ट...**

हवामान विभागाकडून आज पालघर जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. गेल्या पाच दिवसांपासून पालघरमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडला आहे. त्यामुळे काही ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली बघायला मिळाली. यानंतर आता पालघरला पाऊस कमी होण्याची शक्यता आहे. पालघर जिल्ह्याला उद्या पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यानंतर पुढचे काही दिवस पावसाचा ग्रीन अलर्ट असणार आहे. त्यामुळे पालघरमध्ये पाऊस ओसरणार असल्याचं चित्र आहे.ठाण्यात पाऊस ओसरणार

ठाणे जिल्ह्यात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, टिटवाळा, अंबरनाथ, उल्हासनगर या शहरांमध्ये पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातलेला बघायला मिळाला. सलग पाच दिवस पडलेल्या पावसामुळे उल्हास नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झालेली आहे. तसेच मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं. पण आता उद्यापासून ठाणे जिल्ह्यात



पाऊस ओसरण्याची शक्यता आहे. ठाणे जिल्ह्याला आज ऑरेंज तर उद्यापासून ग्रीन अलर्ट देण्यात आला आहे.

**मुंबईतही पाऊस ओसरणार**

मुंबईत पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला होता. पण आतापावसाचायलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईत ठराविक ठिकाणी वाऱ्याचा वेग हा ६० ते ७० किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे आणि पावसाची शक्यता आहे. पण उद्यापासून मुंबईत पाऊस ओसरणार आहे.

**रायगडला उद्या यलो अलर्ट**

रायगड जिल्ह्याला पावसाने अक्षरशः झोडपून काढलं आहे. रायगडला आज पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. आजदेखील रायगडमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे रायगडमधील नद्या दुथडी भरुन वाहत आहेत. अनेक ठिकाणी पूरसदृश्य स्थिती आहे. दरम्यान, उद्यापासून पाऊस कमी होणार आहे. रायगडला उद्या पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**रत्नागिरीत काय स्थिती?**

रत्नागिरी जिल्ह्याला पुढच्या तीन दिवसांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर सिंधुदुर्ग जिल्ह्याला केवळ आजच्या दिवसासाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**उत्तर महाराष्ट्रात काय स्थिती?**

धुळे जिल्ह्याला आज पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर नंदुरबार जिल्ह्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. पण उद्या पावसाची शक्यता कमी आहे. जळगाव जिल्ह्याला आज पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पण तितका पाऊस नसेल.नाशिक जिल्ह्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर नाशिक घाट परिसरात पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याला पावसाचा आज यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पण उद्या पावसाची शक्यता कमी आहे. पुण्याच्या घाट परिसरात पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**कोल्हापूरला यलो अलर्ट**

कोल्हापूरच्या घाट परिसरात आज आणि उद्यासाठीपावसाचायलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर साताऱ्यात घाट परिसरात पुढच्या दोन दिवसांसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर ९ जुलैला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**विदर्भात पावसाचा यलो अलर्ट**

अकोला, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यांना आजसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपूर, वर्धा, वाशिम या जिल्ह्यांना आज पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वर्धा जिल्ह्याला ९ जुलैलादेखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्याला ९ आणि जुलैला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## आरटीओतील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी ; दोषींवर कठोर कारवाई - मुख्यमंत्री फडणवीस


**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, मुंबई :** राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) विभागातील कथित गैरव्यवहार, कर चुकवेगिरी आणि अनियमिततांच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासंदर्भात परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली असून, सभागृहातील सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महागड्या लक्झरी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात काही प्रकरणांमध्ये कर चुकवेगिरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

काही वाहनमालक महाराष्ट्रात वास्तव्यास असून आणि राज्यातील बँकांकडून कर्ज घेत असतानाही वाहनांची नोंदणी मात्र दादरा-नगर हवेली, दमण-दीव, पुदुच्चेरी आदी ठिकाणी केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. अशा प्रकारांवर



आरटीओकडून कारवाई सुरू आहे. भविष्यात कर चुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी पडताळणी; तसेच कर्ज व रहिवासाशी संबंधित कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात येईल. आरटीओ विभागासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी, ध्वनिचित्रफिती आणि अन्य आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकारी प्रियंका नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. या त्रिसदस्यीय समितीत अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड आणि दक्षता अधिकारी मंदार जावळे यांचा समावेश आहे. या समितीला एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## रोहित तायक्कांडो अकादमीच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०७, मुंबई :** अहिल्यानगर येथे तायक्कांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक ३, ४ व ५ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्कांडो चॅम्पियनशिप स्पर्धेत परेल-भोईवाडा येथील रोहित तायक्कांडो अकादमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत पी-व्ही, सब-ज्युनियर, कॅडेट आणि युथ गटांमध्ये, महाराष्ट्रातून सुमारे ६०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

**या स्पर्धेत रोहित अकादमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत पुढीलप्रमाणे पदके पटकावली :**

**सावी लोके – रौप्य पदक**

**सान्वी बडंबे – कांस्य पदक.**

**श्रावणी पिंगळे – कांस्य पदक.**

या सर्व खेळाडूंना प्रमुख प्रशिक्षक रोहित कदम तसेच सहप्रशिक्षक नेत्रा सुतार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षण, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनामुळे खेळाडूंनी ही उल्लेखनीय कामगिरी करत अकादमीचा आणि परेल-भोईवाडा परिसराचा गौरव वाढविला.

या यशाबद्दल सर्व पदकविजेत्या खेळाडू, प्रमुख प्रशिक्षक रोहित सर आणि सहप्रशिक्षक नेत्रा सुतार यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, आगामी राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांमध्येही ते अशीच दमदार कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## आळंदीच्या पूरग्रस्त पायाभूत सुविधांसाठी नगरविकास विभागाकडून १० कोटींचा विशेष निधी मंजूर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, आळंदी :** आळंदी शहरामध्ये इंद्रायणी नदीला आलेल्या महापुरामुळे झालेल्या नुकसानीची दुरुस्ती तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामार्फत आळंदी नगरपरिषदेस ₹१० कोटींचा



विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे.

सदर निधीचा उपयोग पाणीपुरवठा व्यवस्था पूर्ववत करणे, पूरग्रस्त रस्त्यांची दुरुस्ती, विद्युत व्यवस्था सुरळीत करणे, इंद्रायणी नदीवरील पूल व सुरक्षेचे कठडे दुरुस्त करणे तसेच गटार व स्वच्छता व्यवस्था सक्षम करण्यासाठी करण्यात येणार आहे. याशिवाय वारकरी भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही हा निधी वापरण्यात येणार आहे.

पूरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरी सुविधांची तातडीने पुनर्बांधणी करून नागरिक व वारकरी भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी आळंदी नगरपरिषद युद्धपातळीवर काम करत असून मंजूर निधीतील कामांना त्वरित प्रारंभ करण्यात येणार आहे.

आळंदी नगरपरिषद महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग तसेच या विशेष निधीस मान्यता देणाऱ्या शासनाचे मनः पूर्वक आभार व्यक्त करते.

## पवारांची राष्ट्रवादी सत्तेत जाण्याची चर्चा, संभाव्य राजकीय भूकंपावर फडणवीसांची प्रतिक्रिया

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी नवा भूकंप घडणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार याच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आगामी काळात सत्तेत सहभागी होण्यासाठी पडद्यामागे मोठ्या घडामोडी सुरु असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.

या चर्चा निर्माण होण्यामागे दोन बड्या नेत्यांची भेट कारणीभूत ठरली आहे. शरद पवारांचे विश्वासू नेते जयंत पाटील आणि भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे यांची नुकतीच भेट झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. त्यांच्या या भेटीवरुन शरद पवारांचा पक्ष एनडीएमध्ये सहभागी व्हावा यासाठी हालचारी सुरु असल्याची चर्चा आहे. या वृत्तावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

**चर्चेस कारण काय?**

राजकीय वर्तुळात सुरु असलेल्या चर्चांनुसार, केंद्र सरकारला मतदारसंघ पुनर्रचना विधेयक संसदेत मंजूर करुन घ्यायचं आहे. याआधी केंद्र सरकारने संसदेचं विशेष अधिवेशन बोलावत हे विधेयक मांडलं होतं. पण हे विधेयक मान्य होऊ शकलं नव्हतं. त्यामुळे आता केंद्र सरकार पुन्हा हे विधेयक पावसाळी अधिवेशनात मांडण्याची शक्यता आहे.

या विधेयकाला मंजुरी मिळावी यासाठी भाजपला आणखी खासदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे ८ खासदार आहेत. त्यामुळे जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्या अनौपचारिक भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दोन्ही नेत्यांच्या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे. दोन्ही नेत्यांनी एकत्रित काम



केलं असताना त्यांच्यात पक्षविरहीत मैत्रीचं नातं आहे. त्यामुळे कदाचित ते भेटले असावेत, असं दत्तात्रय भरणे म्हणाले आहेत. तर खासदार सुप्रिया सुळे यांना याबाबत प्रश्न विचारला असता, जयंत पाटील आणि विनोद तावडे यांची बैठक कुठे झाली? मला नाही माहिती. मी तुमच्याकडून ऐकत आहे, असं उत्तर त्यानी दिलं.

**विजय वडेट्टीवार यांचं सूचक वक्तव्य...**

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या चर्चांवर सूचक वक्तव्य केलं आहे. शरद पवारांचा राष्ट्रवादी पक्ष सत्तेत जाणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. एवढं मात्र नक्की आहे. आता त्यांना कोणता रस्ता सोयिस्कर असतो, वैचारिक की सत्तेचा?, असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं.

**देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?**

या सर्व घडामोडींनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी या चर्चा फेटाळल्या आहेत. महाराष्ट्रातून NDA मध्ये कुठला नवीन पक्ष येणार नाही. आता जे पक्ष आहेत तेच पक्ष NDA मध्ये राहतील. कुठलाही नवीन पक्ष आता एनडीएमध्ये येण्याची आमची चर्चा नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

आम्ही शरद पवारांच्या सोबतच्या कुणालाही तोडण्याचा प्रयत्न करत नाही. जे त्यांच्यासोबत आहेत, शरद पवार यांच्या पक्षात जे आमदार आणि खासदार आहेत, त्यापैकी कुणालाही तोडण्याचा आमचा प्रयत्न नाही, असंही फडणवीसांनी स्पष्ट केलं.

## संपादकीय

### ओझोनचे विषारी संकट

दिल्ली हे विलक्षण महानगर आहे. इथं सरकार कोणाचंही आलं-गेलं, कसल्याही घोषणा झाल्या तरी दर वर्षी नेमाने होणारी चर्चा म्हणजे भारताच्या या राष्ट्रीय राजधानीतलं नेमेची येणारं प्रदूषण. पण आता 'भूपृष्ठीय ओझोन' अर्थात ग्राउंड-लेव्हल ओझोन नावाचा अदृश्य आणि अधिक कपटी शत्रू दिल्ली-एनसीआरला कसा गिळत चालला आहे याबाबतचं ताजं वृत्त दिल्लीकरांसाठी आणखी चिंताजनक ठरणारं आहे.

पर्यावरणीय प्रदूषणाला शहरे-राज्ये-जात-धर्म यांच्या मर्यादा नसल्यानं ही केवळ आकडेवारी नाही; ही आपल्या शहरांच्या भविष्यातील आरोग्य प्रगतिपुस्तकावरची लाल शाईतली नोंद ठरावी, असा इशारा या वृत्तात आहे. मुंबईसह बहुतांश महानगरांत प्रमाणाच्या आणि व्यवस्थेच्या आटोक्याबाहेर गेलेलं वाहन प्रदूषण, औद्योगिक उत्सर्जन, उष्णतेच्या लाटा आणि बदलतं हवामान यांची बेरीज केली, तर प्रदूषणाच्या बाबतीत नेहमी दिल्लीकडं बोट दाखवता दाखवता उद्या मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक आदी महानगरांचीही अवस्था 'अकस्मात तोही पुढे जात आहे' अशी झाली तर आश्चर्य नाही. शिक्षण-आरोग्य-पर्यावरणादी मुद्दे विकसित देशांत चालतात, आपल्याकडं दुर्दैवानं राजकारणाचा फड जिंकण्यासाठी ते उपयोगी ठरत नाहीत हे सत्य असलं तरी.

मुळात ओझोन शब्द ऐकला की आपल्या डोळ्यांसमोर पृथ्वीभोवतीचं संरक्षक कवच उभं राहतं. ओझोनचा थर पृथ्वीला सूर्याच्या अतिनील किरणांपासून वाचवतो, ही विज्ञानाच्या पुस्तकातली माहिती शालेय वयापासूनच डोक्यात घट्ट बसलेली असते. पण पृथ्वीपासून १५ ते ३५ किलोमीटर उंचीवर असलेला जीवनदाता ओझोन जमिनीच्या पातळीवर तयार झाला की तो जीवघेण्या प्रदूषकाचं रूप घेतो. समताप मंडळातील ओझोन पृथ्वीचं कवच आहेच; पण जमिनीच्या पातळीवरचा ओझोन हा महाप्रदूषकाची भूमिका बजावतो. त्याची निर्मिती थेट कारखान्यांतून वगैरे होत नाही. (वर्तमानात इथेनॉलमिश्रित पेट्रोल पिऊन धावणाऱ्या!) वाहनांमधून बाहेर पडणारे नायट्रोजन ऑक्साइड्स, उद्योगांतील बाष्पशील सेंद्रिय संयुगं आणि दिल्लीत जास्तीत जास्त मुक्काम ठोकणाऱ्या उन्हाळ्यातली भयानक उष्णता यांची युती झाली की त्यातून रासायनिक अभिक्रिया होऊन हा अदृश्य विषारी वायू तयार होतो तो अधिक धोकादायक ठरतो.

केंद्रीय विज्ञान आणि पर्यावरण केंद्रानं (सीएसई) २०२१ ते २०२६ या सहा वर्षांच्या आकडेवारीचं विश्लेषण करून नुकताच प्रसिद्ध केलेला अहवाल वरील बातमीचा आधार. हा अहवाल भारताच्या प्रदूषणविषयक धोरणालाच प्रश्न विचारतो. यासार दिल्ली-एनसीआर (राष्ट्रीय राजधानी क्षेत्र) हा देशातील सर्वांत मोठा ओझोन हॉटस्पॉट बनला आहे. दिल्ली, नोएडा, ग्रेटर नोएडा, गाझियाबाद, फरीदाबाद येथे उन्हाळ्यात दररोज सुरक्षित मर्यादेपेक्षा अधिक ओझोन नोंदवला गेला. दिल्लीत अनेक वायूमापक निरीक्षण केंद्रांवर गेले अनेक दिवस ओझोन प्रदूषणाची सरासरी रोज मर्यादा ओलांडत होती. ग्रेटर नोएडात तब्बल ४४ दिवस ओझोनची पातळी धोकादायक होती. दिल्ली-एनसीआरमध्ये तब्बल ४६ रात्री अशा नोंदल्या गेल्या, ज्या वेळी रात्रीही ओझोनची पातळी सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त होती. 'टॉक्सिक नाइट्स' हे दिल्ली-एनसीआरमध्ये आता वास्तव होत आहे. दिवसाचे भोग भोगून घरी परतलेल्या नागरिकांना झोपेतही विषारी हवा श्वासातून आत घेत राहावी लागत असेल, तर त्यापेक्षा शोकांतिका कोणती?

हा ओझोन फुफ्फुसांच्या महत्त्वाच्या पेशींना थेट इजा पोहोचवतो, कोणत्याही वयोगटातील व्यक्तीसाठी श्वासनलिकांत सूज निर्माण करतो. दमा, ॲलर्जी, श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ, छातीत दुखणं आणि हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका तो वाढवतो. स्वतः हरित-गृह वायू असलेल्या ओझोनचं नुकसान केवळ माणसांपुरतं मर्यादित नाही, तर ओझोन प्रदूषणाचं संकट अन्नसुरक्षा, अर्थव्यवस्था आणि हवामान यांच्याशी जोडलेली राष्ट्रीय समस्या झाली आहे. या अतिरिक्त ओझोनमुळे गव्हाच्या उत्पादनात दर वर्षी १४ ते १५ टक्क्यांपर्यंत घट होत असल्याचंही एका संशोधनात आढळलं आहे.

**- मंगेश वैशंपायन**

# शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!



मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे. मागील दोन तीन दिवसांपासून मुंबईत चालू असलेल्या पावसाने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवली. मागील ४८ तासांत मुंबईत ३८० मिली पाऊस झाला. या पावसाने १२ मुंबईकरांना हिरावून नेले. गेल्या तीन दिवसात मुंबईत १२ जणांना आपला जीव गमवावा लागला.

या पावसाने क्षणात होत्याचे नव्हते झाले. दरवर्षीप्रमाणे यावेळीही पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली. पाणी तुंबल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. जागोजागी गुडघाभर पाणी साचले. रस्त्यांवर देखील पाणी साचले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली. महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला. रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. मुंबई पुणे रेल्वे मार्गावर रुळ वाहून गेल्याने या मार्गावरील लांबपल्ल्याच्या गाड्या रद्द कराव्या लागल्या. काही गाड्यांचा मार्ग बदलावा लागला. पावसामुळे काही लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावू लागल्या. लोकलही धीम्या गतीने सोडाव्या लागल्या. लोकांच्या घरात पाणी साचल्याने लोकांचा संसार पाण्याखाली गेला. पावसामुळे शाळा कॉलेजना सुट्टी द्यावी लागली. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. मोठ्या पावसाने मुंबईची दैना का झाली याला जबाबदार कोण ? यावर राजकारण सुरू झाले ; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते ? पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते ? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत. २६ जुलैच्या पावसानंतर शासन, प्रशासन आणि नागरिकांनीही कोणताच धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा. पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनले आहे.

मुंबईतील रस्तेही सिमेंटचे आणि पेव्हर ब्लॉकचे बनले आहे त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते. त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक ! राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल. नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. यासोबतच नागरिकांनी वाटेल तिथे कचरा टाकायची सवयही मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे दरवर्षी मुंबईच्या समुद्र पातळीत वाढ होतेय. मुंबई तुंबण्याचे हे ही एक कारण आहे. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते.


दोन वर्षापूर्वी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. सहा वर्षापुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पावसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची इतिहासातील ती पहिलीच वेळ होती. मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचा देखील अंदाज येत नाही. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो. आता हेच पहा ना जून महिन्यात पाठ फिरवणाऱ्या पावसाने ज्युली महिन्याच्या सुरवातीलाच धुमाकूळ घातला आहे. अवघ्या दोन दिवसात त्याने दोन महिन्याची सरासरी ओलांडली आहे. जुलै महिन्याचा सुरवातीलाच इतका पाऊस यापूर्वी कधीही झाला नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांची 'मार्सेलिस' येथील जगप्रसिद्ध उडी !

मे, १९०९ मध्ये सावरकर बॅरिस्टर परीक्षा उत्तीर्ण झाले परंतु इंग्रज सरकारने त्यांना पदवी देण्यास नकार दिला. याची अनेक कारणे आहेत. लंडनमध्ये मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकार्याला गोळ्या घालून ठार मारले.इग्लंडमध्ये एका भारतीय तरूणाने एका इंग्रज अधिकार्याला मारले हा मोठा पराक्रमच होता. मदनलालच्या या कृतिमागे सावरकरांचाच हात हता. भारतात सुद्धा इंग्रज सरकारच्या विरोधात कटाच्या अनेक घटना घडत होत्या. नाशिकच्याकटात सावरकरांचे अनेक बालमित्र पकडले गेले हते. त्यांचे वडीलबंधू गणेश सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली, लहानभाऊ नारायण सावरकर यांनाही सरकारने पकडले होते. या सगळ्याच्या मुळाशी विनायक सावरकर आहेत अशाबातम्या इंग्रजांकडे असल्याने त्यांच्या हालचालींवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. फ्रान्सहून परत येताना इंग्रज सरकारच्या पोलिसांनी सावरकरांना अटक केली. सावरकरांवर हिंदुस्थानात राजद्रह केल्याचा आरप ठेवून तेथे खटला चालवण्यासाठी त्यांची रवानगी हिंदुस्थानात केली गेली.

१ जुलै, १९१० यादिवशी सावरकर हिंदुस्थानात परत येण्यासाठी 'मरिया' बटीत बसले. त्यांच्यावर रात्रंदिवस डळ्यात तेल घालून दोन इंग्रज पहारेकरी लक्ष ठेवून हते. सावरकरांच्या डक्यात इथुन कसे निसटता येइल हाच विचार चालूहोता. मोरिया बोट मार्सेलिस बंदरात यांत्रिक बिघाडामुळे काही काळ थांबली होती. सावरकरांनी बोटीचे निरीक्षण करून 'पोर्ट हल' मधून पसार हण्याचा निश्चय केला होता. अनायासे बोट इथे थांबली आहे, जर आपण इथुन पहत जावून फ्रान्सचा किनारा गाठला तर आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार इंग्रज अधिकारी आपल्याला पकडु शकणार नाहीत. या सगळ्या गोष्टींचा त्यांनी व्यवस्थित अभ्यास केलेला होता. ८ जुलै, १९१० रोजी शौचकूपात जावून तिथल्या काचेच्यादरवाज्यावर स्वतःचा अंगरखा ठेवला त्यामुळे बाहेर उभ्या पहारेकर्यांना आतल्या हालचाली दिसणार नाहीत. खरचटण्याची, रखड्यांची व चामडी सलवटण्याची पर्वा न करता त्या अथांग सागरात सावरकरांनी उडी मारली. पहत पहतते फ्रान्सच्या किनार्यावर पचले देखिल पण इंग्रज शिपायांच्या लालचीला बळी पडून फ्रान्सच्या पलिसांनी त्यांना इंग्रजांच्या स्वाधीन केले. वरील घटनेचा अभ्यास केला असता काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. एक म्हणजे समुद्रात उडी घेवून किनार्यापर्यंत पहत पहत पोचायचे हा निर्णय घेणे हे दुबळ्याचे काम नाही, यासाठी प्रचंड शारीरिक शक्ति आणि मनाचा निर्धार लागला असणार. दुसरी गोष्ट कायद्याचा व्यवस्थित अभ्यास आणि त्याचा अचुक वापर करण्याची बुद्धि. काही वेळा असेही वाटते योगसामर्थ्याने 'लघिमा' 'गरिमा' सारख्या योगसिद्धि तर त्यांना प्राप्त नव्हत्या? कारण, त्या एवढ्याश्या भोकातून सगळा देह बाहेर काढणे खरोखर आश्चर्यजनकच आहे..



सावरकराची ही उडी पाहून लोककवी मनमोहन म्हणतात,

ही उडी बघतांना मृत्यू कर्तव्य विसरला ।
बुरुजावर झेपावलेला झाशीतील घोडा हसला ।।
वासुदेव बळवंतांच्या कंठात हर्ष गदगदला ।
क्रांतीच्या केतूवरला अस्मान कडाडून गेला ।।
विश्वात केवळ आहेत विख्यात बहाद्दूर दोन ।
जे गेले आईकरिता सागरास पालांडून ।
हनुमानानंतर आहे त्या विनायकाचा मान ।।
– – लोककवी मनमोहन

भारतात आल्यावर मुंबईत विशेष न्यायालय निर्माण करून सावरकरांवर इंग्रज सरकारने खटला चालवला. तसेच नाशिक कटाच्या दुसर्या खटल्याचे कामकाजही सुरू होतेच. दोन्ही खटल्यांचा निकाल लागला आणि सावरकरांना दोन जन्मठेपेची म्हणजे ५० वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. हे ऐकून सुद्धा या वीराच्या प्रसन्नतेत काहीच फरक पडला नाही. उलट एक इंग्रज अधिकारी जेव्हा त्यांच्याशी कुत्सितपणे त्यांच्या या ५० वर्षे शिक्षेबद्दल बोलला तेव्हा सावरकरांनीच त्याला प्रतिप्रश्न विचारला, 'ब्रिटिश सरकार तरी इथे अजुन ५० वर्षे टिकणार आहे का?' सावरकरांची ही भविष्यवाणी खरोखरच खरी ठरली. आणि भारताला १५ ऑगस्ट१९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले.

**(साभार : बालसंस्कार डॉट कॉम)**
**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

### मन मोकळे

द्या वैधानिक इशारा
सगळे झाले मोकळे
जाहिरातीवरी श्रध्दा
विश्वास ठेवी निर्मळे

बारीकअस्पष्ट अक्षरे
अटींचा अर्थ ना कळे
सल्लागारांवर विसंबे
आम्ही निर्बुद्धठोकळे

इशारा देऊनसरकार
ते झाले नामानिराळे
जाहिरातीवरविश्वास
उडवतबसे भुसनाळे

सुपरस्टार झळकले
सल्ले देतात आगळे
गुंतवणूकीत जोखीम
चित्र विचित्र ते वेगळे

पैसे मुश्किले जोडून
बचत करतात भोळे
सल्लागार रे टपलेले
खिळे खिशावरडोळे

कमाई लावी जुगारी
डोक्या मातीचे गोळे
शेअरबाजार कोसळे
तेंव्हाचंगडबडालोळे

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# मालाड येथील शाळेतील प्रार्थना कार्यक्रम प्रकरणी गुन्हा दाखल - गृह राज्यमंत्री डॉ.भोयर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** मुंबईतील मालाड पश्चिम येथील रिजॉयस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रार्थना कार्यक्रमाबाबत प्राप्त तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे, अशी माहिती गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.



सदस्य अतुल भातखळकर यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता, त्यास उत्तर देताना ते बोलत होते. डॉ.भोयर यांनी सांगितले की,१० मे २०२६ रोजी मालाड पश्चिम येथील रिजॉयस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित प्रार्थना कार्यक्रमात एका व्यक्तीने उपस्थितांच्या डोक्यावर हात ठेवून आजार बरे करण्यासह जीवनातील दुःख दूर करण्याबाबत दावे केल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी चौकशी केली असता, उपस्थितांना धर्मांतर करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा आग्रह करण्यात आल्याचे आढळून आले नाही. तथापि, चौकशीदरम्यान तक्रारदाराला घरामध्ये देवी-देवतांची छायाचित्रे लावू नयेत,असे सांगण्यात आल्याचे निष्पन्न झाले; तसेच संबंधित कार्यक्रमातून अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचा प्रकार निदर्शनास आल्याने मालाड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींसह महाराष्ट्र नरबळी, इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणातील सर्व बाबींची सखोल चौकशी सुरू असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. शाळांमध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित होऊ नयेत यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत आवश्यक आदेश निर्गमित करण्याबाबतही कार्यवाही करण्यात येईल,असे डॉ. भोयर यांनी सांगितले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## डॉक्टरांवर कथित हल्ला; लोकप्रतिनिधींच्या वर्तनावर गंभीर प्रश्नचिन्ह?



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०७, डोंबिवली (ठाणे) :** जनतेच्या प्रश्नांसाठी लढण्याची जबाबदारी असलेल्या लोकप्रतिनिधींवरच सरकारी रुग्णालयातील डॉक्टर आणि नर्स यांच्याशी कथित गैरवर्तन व मारहाण केल्याचा गंभीर आरोप झाल्याने शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणात शिवसेना (शिंदे गट) चे नगरसेवक रमेश म्हात्रे आणि त्यांच्या काही समर्थकांवर महिला डॉक्टर, दोन डॉक्टर व तीन नर्स यांना शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचे कथित उउढत फुटेजही समोर आल्याचे वृत्त आहे.

माहितीनुसार, एका गर्भवती महिलेच्या उपचारादरम्यान नवजात बाळाला एनआयसीयू उपचारांची गरज लागू शकते, अशी माहिती डॉक्टरांनी नातेवाईकांना दिली होती. मात्र रुग्णालयातील एनआयसीयू बेड उपलब्ध नसल्याने अन्य रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला. यानंतर वाद निर्माण होऊन कथित मारहाणीची घटना घडल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर डॉक्टर, नर्स आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले असून, सरकारी रुग्णालयातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सत्ता, पद किंवा राजकीय प्रभाव कोणाचाही असो – कायद्यापुढे सर्व समान आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून, दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. डॉक्टरांवर होणाऱ्या हिंसाचाराला आळा बसला नाही, तर आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## भिजपावसाने सावरगावच्या चिकणेवाडीत घराची भिंत कोसळली

### संकटग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या मदतीसाठी धावले रविंद्र राजदेव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील गेल्या ४-५ दिवसांपासून सुरू असलेल्या भिज पावसामुळे ग्रामीण भागातील एका शेतकरी कुटुंबाच्या डोक्यावरचे छप्परच संकटात आणले आहे. पारनेर तालुक्यातील सावरगाव येथील चिकणेवाडीमध्ये राहणारे शेतकरी पुंडलिक गोविंद चिकणे यांच्या घराच्या पुढील व मागील बाजूच्या दगडी भिंती अचानक कोसळल्याने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गेल्या ४ -५ दिवसांपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे भिंती पूर्णपणे ढासळल्या. उर्वरित भिंतींनाही मोठे तडे गेल्याने घर कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत आहे. जीव मुठीत धरून जगण्याची वेळ या कुटुंबावर आली आहे. या दुर्घटनेत सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. घरात असलेल्या चांगुणाबाई चिकणे व त्यांचा मुलगा त्या क्षणी घराबाहेर असल्यामुळे अनर्थ टळला. मात्र आयुष्यभराच्या कष्टातून उभारलेले घर क्षणात उद्ध्वस्त झाल्याने कुटुंबावर आर्थिक आणि मानसिक आघात झाला आहे. आता या कुटुंबासमोर सुरक्षित निवाऱ्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.

घटनेची माहिती मिळताच टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रविंद्र राजदेव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी संबंधित तलाठी व महसूल अधिकाऱ्यांना बोलावून पंचनामा करून घेतला आणि शासनाच्या आपत्ती निवारण निधीतून त्वरित आर्थिक मदत मंजूर करण्याची मागणी केली. तसेच चिकणे कुटुंबाची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना तातडीने घरकुल योजनेचा लाभ देण्याची मागणीही प्रशासनाकडे केली. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक शिवाजीशेठ बेलकर, सावरगावचे उपसरपंच बाळा चिकणे, भानुदास आग्रे, नवनाथ गांजे, रमेश घोलप, रवींद्र चौधरी, पांडुरंग जेडगुले, तलाठी भालेकर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## महाराष्ट्र ओपन राज्य तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत

### Warrior Taekwondo Academy ची दमदार कामगिरी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, अहिल्यानगर :** महाराष्ट्र ओपन राज्य तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये थरअॅलेअ ढरशज्ञ्पवे अलरवशा ्च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत २ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य पदक जिंकून ठाणे जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. सुवर्णपदक विजेते म्हणून अन्या धुरे (सब-ज्युनियर मुली, ४७ किलो) आणि साई लांडगे (कॅडेट मुले, ५७ किलो) यांनी शानदार खेळ करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. रौप्यपदक मायकेल अॅग्रेल नादर (कॅडेट मुले, ४५ किलो) आणि आर्या राज (युथ मुली, ४४ किलो) यांनी पटकावले, तर विभा मोरे (कॅडेट मुली, ४४ किलो) हिने कांस्यपदक मिळवत अकादमीच्या यशात मोलाची भर घातली.

याशिवाय नितीश्री जाधव, रुजुला परब, आरना कोश्टी, स्वारीत पटेल, तारुष साहा, पियुष, अतिक नादाफ, ईशा विश्वासराव, देविका परब, आराध्या गुरव आणि समर्थ मोटे यांनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेत Warrior Taekwondo Academy ने एकूण २ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य अशी ५ पदकांची कमाई केली. अकादमीचे मुख्य प्रशिक्षक मंगेश औटी यांनी सर्व पदक विजेत्यांचे व सहभागी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच खेळाडूंच्या यशामागे पालकांचे सहकार्य, सातत्यपूर्ण मेहनत आणि शिस्त यांचे महत्त्व अधोरेखित करत उर्वरित सामन्यांसाठी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. Warrior Taekwondo Academy ही संस्था भविष्यातही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट खेळाडू घडविण्यास कटिबद्ध असून ठाणे जिल्ह्याचा क्रीडा गौरव अधिक उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

# जादूटोण्याची भीती दाखवून महिलेवर अत्याचार; भोंदूबाबाला सायखेडा पोलिसांकडून अटक

## 'अंनिस'च्या पाठपुराव्यानंतर कारवाई; व्यवसाय वाढवण्याच्या बहाण्याने फसवणूक, बळजबरीने केला विवाह





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, सायखेडा (नाशिक) :** व्यवसायात भरभराट करून देण्याचे आमिष दाखवून, जादूटोण्याची भीती घालत एका महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी सायखेडा पोलिसांनी भोंदूबाबा यौवन भानुदास गोहाड (रा.दारणा सांगवी) याला अटक केली आहे. स्वतः विवाहित असतानाही आरोपीने पीडितेशी जबरदस्तीने लग्न केले होते. 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'च्या (अंनिस) सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर पोलिसांमार्फत ही धडक कारवाई करण्यात आली.

### नेमके काय घडले?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिकमधील पंचवटी परिसरातील पीडित महिला चहाचे दुकान चालवून आपला उदरनिर्वाह करत होती. व्यवसायात अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने, ओळखीच्या काही व्यक्तींनी तिला दारणा सांगवी येथील भोंदूबाबा यौवन गोहाड याच्याकडे जाण्याचा सल्ला दिला. गोहाड याने मंत्रतंत्र, जादूटोणा, मंतरलेले तांदूळ, धुनी आणि जडीबुटीच्या पुड्या देऊन व्यवसायात मोठी भरभराट होईल, असे खोटे आमिष दाखवले आणि तिच्याकडून सुरुवातीला ३ हजार रुपये उकळले.

### जादूटोण्याची भीती आणि अत्याचार

त्यानंतर मूळ स्वरूप उघड करत आरोपी गोहाड याने, माझ्याशी शारीरिक संबंध ठेवले नाहीत तर जादूटोणा करून तुला आणि तुझ्या कुटुंबाला ठार मारीन, अशी धमकी देण्यास सुरुवात केली. या भीतीपोटी आरोपीने पीडितेवर वारंवार बलात्कार केला. आरोपीचे पहिले लग्न झालेले असतानाही त्याने पीडित महिलेशी बळजबरीने विवाह केला.

### २ ते ३ वर्षे छळ; मायलेकाला मारण्याचा प्रयत्न

विवाहानंतर घरात सुरू असलेल्या भोंदूगिरीला आणि अघोरी प्रथांना पीडित महिलेने कडाडून विरोध केला. याचा राग आल्याने आरोपीने तिला बेदम मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या देण्यास सुरुवात केली. हा छळ गेली २ ते ३ वर्षे अविरत सुरू होता. काही दिवसांपूर्वी क्रूरतेची सीमा गाठत आरोपीने पीडित महिला आणि तिच्या अवघ्या एक वर्षाच्या मुलाचा गळा दाबून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. या जीवघेण्या प्रसंगातून स्वतःची सुटका करून घेत पीडितेने नातेवाईकांचे घर गाठले.

### 'अंनिस'च्या मदतीने पोलिसांत धाव

नातेवाईकांच्या सल्ल्याने पीडितेने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. अंनिसच्या पदाधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेत तिला नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात नेले व तक्रार दाखल करण्यास मदत केली. जिल्हा पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांच्या आदेशानंतर, सायखेडा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध'महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायदा'तसेच लैंगिक अत्याचार आणि इतर कलमांन्वये गुन्हा दाखल करून त्याला तात्काळ अटक करण्यात आली आहे.

> **नागरिकांना निर्भयपणे पुढे येण्याचे आवाहन**
>
> भोंदूबाबा यौवन गोहाड याने यापूर्वीही अनेक व्यक्ती आणि कुटुंबांची मंत्रतंत्र व जादूटोण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक आणि मानसिक-शारीरिक शोषण केले असण्याची दाट शक्यता आहे. अशा प्रकारची फसवणूक किंवा अत्याचार सहन केलेल्या कोणत्याही नागरिकांनी भीती न बाळगता निर्भयपणे पुढे यावे आणि पोलिसांकडे तक्रार नोंदवावी.
>
> - डॉ.टी.आर.गोराणे (राज्य प्रधान सचिव, अंनिस)
> - प्रा.आशा लांडगे (जिल्हा कार्याध्यक्ष)
> - प्रल्हाद मिस्त्री व कृष्णा चांदगुडे

## राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.अविनाश चल्लेलवार यांच्या संशोधनाची लंडनमध्ये दखल



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** सरदार पटेल मेम ोरियल सोसायटी (ट्रस्ट) चंद्रपूर राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, रिसर्च अँड टेक्नॉलॉजी, चंद्रपूर येथील गणित विभाग येथे कार्यरत प्रा.डॉ.अविनाश चल्लेलवार यांच्या वैदिक गणित, क्वांटम मॅथेमॅटिक्स, मेरू प्रस्तार आणि आधुनिक संशोधनातील उल्लेखनीय कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

भारतीय ज्ञान प्रणाली, वैदिक गणित आणि भारतीय सांस्कृतिक वारशाच्या वैज्ञानिक व शैक्षणिक पैलूंवर संशोधन करणाऱ्या डॉ.चल्लेवार यांचे कार्य देश-विदेशात चर्चेचा विषय ठरत आहे.

अॅनशियंट वैदिक मॅथेमॅटिक्स बियांड टाईम Ancient Vedic Mathematics Beyond Time`m संकल्पनेवर आधारित त्यांच्या संशोधनात प्राचीन भारतीय गणितीय ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा संगम साधण्याचा प्रयत्न आणि विश्लेषण विषयांवरील त्यांच्या अभ्यासाने गणित क्षेत्रात नवीन दृष्टिकोन निर्माण केला आहे. प्रतिष्ठित लंडन हेरॉल्ड London Herald विशेष आवृत्तीत त्यांच्या संशोधन प्रवासावर मॅगेझीन कव्हर पेज आणि विशेष लेख प्रकाशित करण्यात आला असून, त्यांच्या कार्याचे लंडनमध्ये कौतुक झाले आहे. लंडन हेरॉल्ड डेपवेप क्शअॅरश्रवविशेष आवृत्ती मासिकात मोजक्या भारतीयांची निवड झाली असून विविध क्षेत्रातील विशेषज्ञ यांचे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. प्रा.डॉ.चल्लेलवार यांनी जवळपास १९ वर्षांपेक्षा अधिक काळ शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात योगदान दिले असून, संशोधक, प्राध्यापक, लेखक आणि म ार्गदर्शक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना दिशा दिली आहे. त्यांच्या संशोधनावर लंडनमध्ये चर्चा झाली असून, भारतीय प्राचीन गणितीय परंपरेला आधुनिक संशोधनाच्या माध्यमातून जागतिक पातळीवर नेण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले. त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये अध्यापन व संशोधन कार्य केले असून, देश - विदेशातील संशोधकांना मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना गणित गुरु रत्न पुरस्कार २०२५,डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम प्रोफेशनल एक्सेलन्स अवॉर्ड यासह विविध सन्मान प्राप्त झाले आहेत.

या आंतरराष्ट्रीय गौरवाबद्दल सरदार पटेल मेमोरियल सोसायटी (ट्रस्ट)चे अध्यक्ष विनोद दत्तात्रेय, राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, रिसर्च अँड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ.अनिल झेड चिताडे तसेच महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी प्रा.डॉ.अविनाश चल्लेलवार यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## कोकणातील ४ नद्यांनी ओलांडली धोका पातळी, प्रशासन सतर्क

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** कोकण विभागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे नद्यांच्या जलस्तरात मोठी वाढ झाली आहे. दिनांक ०७ जुलै २०२६ रोजी प्राप्त झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, कोकण विभागातील एकूण २७ प्रमुख नद्यांपैकी ४ नद्यांनी धोका पातळी ओलांडली असून, उर्वरित सर्व नद्या सध्या इशारा पातळीच्या खाली वाहत आहेत. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही नद्यांनी धोक्याचे निशाण पार केल्याम ुळे प्रशासनाकडून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातून वाहणाऱ्या कुंडलिका नदीने २३.९५ मीटर या आपल्या धोका पातळीवरुन २३.३० मीटरवर (इशारा पातळी २३.०० मीटर) पोहचली आहे, तर अंबा नदी ९.०० मीटरची धोका पातळी ओलांडून १२.०५ मीटरची पातळी गाठली आहे. महाडमधील सावित्री नदी ६.५० मीटरची धोका पातळी ओलांडून ७.३५ मीटरवर वाहत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील जगबुडी नदीने देखील ७.०० मीटर या आपल्या धोका पातळीच्या वर जात ७.६० मीटरची पातळी गाठल्याने या भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या ४ नद्या वगळता कोकणातील इतर सर्व प्रमुख नद्या सध्या नियंत्रण आखत्यात आहेत.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथमधील उल्हास नदी बदलापूर येथे १५.३० मीटर (धोका पातळी १७.५० मीटर) आणि जांभूळपाडा येथे १२.७० मीटर (धोका पातळी १४.०० मीटर) वर वाहत आहे. कल्याणमध्ये उल्हास नदी (मोहन) ८.८० मीटर (धोका पातळी १०.०० मीटर) आणि टिटवाळ्यातील काळू नदी १०१.७० मीटर (धोका पातळी १०३.५० मीटर) आणि शहापूरमधील भातसा नदी ३३.२० मीटरवर स्थिर आहे. पालघर जिल्ह्यातही परिस्थिती नियंत्रणात असून पालघर तालुक्यातील सूर्या नदी १०.३५ मीटर, वैतरणा १०१.४० मीटर आणि पिंजाळ नदी १०२.५० मीटर पातळीवर वाहत आहे, ज्या त्यांच्या धोका पातळीपेक्षा कमी आहेत.

रायगड जिल्ह्यातील अन्य नद्यांमध्ये पनवेलची पाताळगंगा २०.१० मीटर व गाढी नदी ४.६० मीटरवर, तसेच कर्जत येथील उल्हास नदी ४६.९० मीटरवर वाहत असून या नद्यांनी अद्याप इशारा पातळी गाठलेली नाही. रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित नद्यांमध्ये चिपळूणची वशिष्टी ४.३४ मीटर, संगमेश्वरम धील शास्त्री ५.०० मीटर, सोनवी ४.६० म ीटर व बावनदी ६.३५ मीटरवर वाहत आहे. लांजा तालुक्यातील काजळी १५.०० मीटर व मुचकुंदी १.६० मीटरवर, तर राजापूरची कोदवली नदी २.०५ मीटरवर प्रवाहित आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वच नद्या मर्यादेत असून दोडामार्ग येथील तिलारी ३८.६० मीटर, सावंतवाडीतील तेरेखोल २.३० मीटर, कुडाळमधील कर्ली ५.०० मीटर, कणकवलीची गडनदी ३५.०० मीटर आणि वैभववाडीतील वाघोटन नदी ५.५० मीटर पातळीवर वाहत आहे. सर्व पूरग्रस्त आणि संवेदनशील भागात स्थानिक प्रशासनाचे बारीक लक्ष असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मुख्य अभियंत्यांकडे धाव, कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०७, ठाणे :** गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीत सावरकरनगर - लोकमान्यनगर व शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांना महावितरणच्या ढिसाळ कारभाराचा मोठा फटका बसला. वारंवार वीज पुरवठा खंडित होणे, तक्रारींनंतरही दुरुस्तीस होणारा विलंब, कर्मचारी कमतरता आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. या गंभीर समस्येबाबत वागळे विभागीय कार्यकारी अभियंत्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे आज भांडुप येथील महावितरणच्या मुख्यालयात मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या दालनात बैठक घेण्यात आली. बैठकीत परिसरातील वीजपुरवठ्याच्या समस्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. पावसाळ्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी संबंधित विभागात तातडीने मनुष्यबळ वाढविणे, बिघाड निवारणासाठी स्वतंत्र पथके कार्यरत ठेवणे, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक सक्षम करणे, जीर्ण वीजवाहिन्या व उपकरणांची तातडीने दुरुस्ती करणे तसेच वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याची म ागणी करण्यात आली. यावेळी ठाणे महापालिका सभागृह नेते हणमंत जगदाळे, जेष्ठ नगरसेवक दिलीप बारटक्के, नगरसेवक राजा जाधवर, विजय चिंदरकर, दिगंबर ठाकूर आदी जण यावेळी उपस्थित होते. यावेळी मुख्य अभियंता संजय पाटील यांनी समस्येची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देत भविष्यात नागरिकांना त्रास होणार नाही, यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचे आश्वासन दिले. सावरकरनगर- लोकमान्यनगर व शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांना सुरक्षित, सुरळीत व अखंडित वीजपुरवठा मिळावा, हीच बैठकीची प्रमुख अपेक्षा असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# भंडारदरा पाणलोट क्षेत्रात धुवाधार पाऊस

## धोकादायक पर्यटन स्थळे बंद, धबधब्यांवर जाण्यास मनाई


**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, अकोले (अहिल्यानगर) :** भंडारदरा पाणलोट क्षेत्रात धुव्वाधार पाऊस पडत असल्याने भंडारदरा धरणातून ९ हजार ७७४ क्युसेकने तर निळवंडे धरणातून १३ हजार ९९४ क्युसेसने पाणी सोडण्यात आल्याने प्रवरा नदीकाठच्या नागरिकांनी सर्तक राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. भंडारदरा धरणाच्या पाणलोटात गत ३ – ४ दिवसापासुन धुव्वाधार पाऊस पडत असल्याने घाटघर उर्ध्व धरण, भंडारदरा, निळवडे, कृष्णावंती धरणातील पाणी साठा नियंत्रित ठेवण्यासाठी या धरणातून पाण्याचा विसर्ग वाढविला जात आहे. बुधवार पासून प्रवरा पाणलोटात पावसाला सुरुवात झाली आहे, तर गुरुवारी मध्यरात्री पासून पावसाने उग्र रूप धारण केल्याने साम्रद, रतनवाडी, घाटघर, उडदावणे, पांजरे, कोलटेभे, बारी या आदिवासी भागातील जनजीवन विस्कळीत होऊन हवेत गारवा निर्माण झाला आहे. भंडारदरा धरण पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस पडत असल्याने सह्याद्रीच्या डोंगर माथ्यावरून पांढरे शुभ्र धबधबे कोसळू लागले आहेत.

परिसरातील ओडे, नाले दुधडी भरून वाहताना दिसत आहे.आणि मुसळधार पावसामुळे जनावरानसह नागरिकांना बाहेर पडणे अवघड झाले आहे. आदिवासी बांधवांच्या शेकोट्या पुन्हा एकदा पेटल्याचे दिसुन येत आहे तर आपले पशुधन वाचविण्यासाठी आदिवासी शेतकरी बांधवांनी जनावरे घरातच बांधणे पसंत केले. तसेच मुसळधार पाऊस पडत असल्याने भात रोपाना मोठा फटका बसतो कि काय या विवेचनेत शेतकरी आहेत.

भंडारदरा धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवला जात असल्यामुळे निळवंडे धरणातुन ही पाण्याचा विसर्ग वाढला आहे. परिणामी प्रवरा नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पाण्याची आवक वाढल्यास अजून जादा पाणी सोडण्यात येईल असे भंडारदरा धरण शाखा अभियंता प्रविण भांगरे यांनी सांगितले.

गेल्या २४ तासात भंडारदरा येथे १०५ मिमी पावसाची नोंद झाली असून घाटघर १७७ मिमी, रतनवाडी १८२ मिमी, पांजरे १४३ मिमी, वाकी ९८ मिमी, निळवंडे ४८ मिमी, अकोले ४१ मिमी पावसाची नोंद झाली. वाकी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असल्याने कृष्णावंतीतून १५७३ क्युसेसने विसर्ग सुरू आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रवरा नदी पात्रात पाणी झेपावत असल्याने रंधा धबधब्याने रौद्ररूप धारण केले आहे.



**रंधा धबधब्याजवळ पर्यटकांची हुल्लडबाजी**

भंडारदरा धरण परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने भंडारदऱ्यात सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे रंधा धबधबा पाहण्यासाठी रविवारी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. परंतु जमलेली गर्दी पाहून एका पर्यटकाने रंधा येथे प्रवरा नदीच्या वाहत्या पाण्यात उडी घेऊन स्टंट करत दुसऱ्या कडेला पोहतानाचे दृश्य अनेकांनी मोबाईल व कॅमेऱ्यात घेतले आहेत. परंतु पर्यटकांनी पाण्यात उडी मारल्याच्या घटनेची दखल घेत उपविभागीय पोलिस अधिकारी कुणाल सोनवणे यांनी रंधा धबधबा व भंडारदरा धरण परिसरात भेट देऊन कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पर्यटकांना पोलिस प्रशासनाला सूचना केल्या आहेत.

# अण्णा हजारे यांच्या हस्ते राज्यव्यापी शीवपाणंद जनजागरण यात्रेचा शुभारंभ

## शिव पाणंद संघर्ष योद्धा पुरस्काराने राज्यभरातील पदाधिकाऱ्यांचा गौरव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने आदर्शगाव राळेगणसिद्धी येथे पद्मभूषण ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रा व पदाधिकारी सन्मान अभियानाचा उत्साहात शुभारंभ झाला. ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांनी शेतरस्त्यांमुळे ग्रामविकास होतो, हे राळेगणसिद्धीतून दाखवून दिल्याचे सांगितले. त्याचबरोबर शरद पवळे यांच्या सामाजिक कार्यामुळे नारायणगव्हाण – राळेगणसिद्धी परिवाराचे नाते घट्ट झाल्याचे सांगत शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेत न्याय देण्याचे आश्वासन दिले.

राज्यभरातील शेतरस्त्यांच्या लढ्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि संघर्षयोद्ध्यांचा शिव पाणंद संघर्षयोद्धा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनीही शिव पाणंद चळवळीच्या पाठीशी राहणार असल्याचे सांगितले.

चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मा. अण्णा हजारे यांच्या पाठिंब्यामुळे शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला नवी ऊर्जा मिळाली आहे. 'मिशन झिरो पेंडन्सी'च्या माध्यमातून शेतरस्त्यांसाठी संघर्ष करणाऱ्या महाराष्ट्रातील प्रत्येक गरजवंत शेतकऱ्याला हक्काचा, दर्जेदार आणि चिखल मुक्त सिमेंट काँक्रीटचा शेतरस्ता मिळवून देण्यासाठी ही चळवळ अधिक वेगाने पुढे नेली जाईल. यावेळी माझा रस्ता होवो न होवो, पण माझ्या शेवटच्या शेतकरी भावाला दर्जेदार शेतरस्ता मिळेपर्यंत मी थांबणार नाही, असे ठामपणे सांगत शरद पवळे यांनी चळवळीचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांसाठी निस्वार्थपणे संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच गावोगावी जाऊन शेतरस्त्याच्या हक्काबाबत जनजागृती करण्याचा आणि प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. जोरदार पाऊस सुरू असतानाही चळवळीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अण्णा हजारे यांचे स्वीय सहायक दत्ता आवारी, रामदास सातकर, नाना आवारी यांनी मोलाचे सहकार्य केले.


# धो धो पावसाची जादू वर्षासहलीसाठी माथेरानला एक दिवसीय पर्यटकांची प्रचंड गर्दी

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०७, माथेरान :** सह्याद्रीच्या कुशीत वसलेले थंड हवेचे पर्यटनस्थळ माथेरान सध्या मुसळधार पाऊस, दाट धुके आणि हिरव्यागार निसर्गाने नटले असून वर्षासहलीसाठी एकदिवसीय पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. मागील काही वर्षांपासून वर्षापर्यटनाची क्रेझ वाढत असून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे तसेच परिसरातील हजारो पर्यटक दर आठवड्याला माथेरानकडे आकर्षित होत आहेत. रायगड जिल्ह्यातील अनेक धबधबे आणि धोकादायक पर्यटनस्थळांवर अपघाताच्या पार्श्वभूमीवर निर्बंध घालण्यात आल्याने सुरक्षित पर्यटन स्थळ म्हणून माथेरानची निवड पर्यटकांकडून केली जात आहे. येथे मोठे धोकादायक धबधबे नसले तरी सतत कोसळणारा मुसळधार पाऊस, धुक्याची चादर, थंडगार वारे आणि गर्द हिरवीगार वनराई पर्यटकांना वेगळाच आनंद देत आहेत. मिनी ट्रेन मार्ग, जंगलातील पायवाटा, विविध पॉइंट्स आणि घोडेस्वारीचा अनुभव ही पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

मागील काही वर्षांतील वृक्षतोडीमुळे पावसाचे प्रमाण काहीसे घटल्याचे जाणवत होते. मात्र नगरपरिषद, वनविभाग तसेच महाराष्ट्र भूषण आदरणीय नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांनी केलेले मोठ्या प्रमाणातील वृक्षारोपण आणि पालिकेने राबविलेल्या मृदसंधारण व धूप रोखण्याच्या कामांमुळे परिसरातील पर्यावरण अधिक सक्षम झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

२८ जूनपासून सुरू झालेला पाऊस अद्यापही कायम असून या कालावधीत सूर्यदर्शनही झालेले नाही. माथेरान उंच डोंगरावर वसले असल्याने पावसाची तीव्रता येथे कमी जाणवते; मात्र पायथ्याच्या गावांमधील नदी–नाले दुथडी भरून वाहत असून काही ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होत आहे. नगरपरिषदेचे पर्जन्यमापन अधिकारी अन्सार महापुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ जुलैच्या २४ तासांत माथेरानमध्ये तब्बल ४०८.०० मिमी पावसाची नोंद झाली असून हंगामातील एकूण



पर्जन्यमान ११३९.०८ मिमीवर पोहोचले आहे. गेल्या वर्षी याच दिवशी २४ तासांत ९३.०६ मिमी पाऊस झाला होता, तर एकूण पर्जन्यमान १६२५.०८ मिमी इतके होते.

मुसळधार पाऊस, धुक्याने वेढलेले डोंगर, थंडगार वातावरण आणि सुरक्षित वर्षापर्यटनाचा अनुभव यामुळे माथेरान पुन्हा एकदा पर्यटकांच्या पसंतीचे ठिकाण बनले असून येत्या काही आठवड्यांत पर्यटकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुसळधार पावसामुळे म्हाते-मुरा येथे जमीन खचली; ७ कुटुंबांतील ४२ जणांचे सुरक्षित स्थलांतरांचे प्रयत्न सुरू

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०७, जावली (सातारा) :** मेढा तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे म्हाते–मुरा परिसरात जमिनीचा मोठा भाग खचल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून खबरदारीचा उपाय म्हणून ७ कुटुंबांतील सुमारे ४२ नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचे प्रयत्न युध्द पातळीवर सुरू करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार तसेच महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीची पाहणी करून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या. प्रशासनाच्या वतीने प्रभावित कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी हलवुन त्यांच्या निवास, अन्न व इतर मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच परिसरातील जमिनीची स्थिती, भूस्खलनाचा संभाव्य धोका आणि पुढील नुकसान टाळण्यासाठी तज्ज्ञांकडून पाहणी केली जात आहे.दरम्यान, सतत सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, तसेच धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## शिष्यवृत्ती परीक्षेत श्री.ढोकेश्वर विद्यालयाचे यश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहमदनगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील पाचवी व आठवी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत मोठे यश मिळवले आहे. विद्यालयातील एकूण पस्तीस विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत. त्यापैकी पंचवीस विद्यार्थी इयत्ता पाचवीचे तर दहा विद्यार्थी हे इयत्ता आठवी चे पात्र झाले. जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले यश संदीप माकरे २२८/३०० गुण,साई दत्तात्रय चिकणे २१८/३०० गुण, तर कु. अथश्री अजय ठुबे हिने २१६/३०० या तीन विद्यार्थ्यांचा त्यात समावेश आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना कल्पना जाधव, सुमन वाळुंज यांनी मराठी विषयासाठी, पवार मिनाक्षी, वैशाली गायखे यांनी गणित विषयासाठी, सुरेखा ठाणगे, बाबासाहेब जाधव यांनी इंग्रजी विषयासाठी, अतुल सैद, माळवदे यांनी बुद्धिमत्ता विषयासाठी मार्गदर्शन केले, सराव परीक्षा घेऊन नियोजनबद्ध मार्गदर्शन केले.

गुणवत्ता यादीत आलेल्या तीनही विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, आणि बुके देऊन प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी रविंद्र मते, निलेश जासूद, संदीप महांडुळे, नारायण शेळके, श्रीरंग धामणे, सोनल रोहकले, निलम खिलारी, प्रिया डव्हणे, वर्षा भोंडवे, विष्णू भद्रे, संदीप खिलारी, पवन कुटे, भाऊसाहेब बांबेरे, अनुष्का कांबळे, नारायण हरेल, अमोल गोरे, घोडके शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मा.रा.ह.दरे साहेब, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर साहेब, सचिव ॲड विश्वासराव आठरे पाटील साहेब, सहसचिव मुकेशराव मुळे साहेब, खजिनदार ॲड दीपलक्ष्मी म्हसे पाटील, माजी अध्यक्ष नंदकुमार झावरे साहेब, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम आण्णा खिलारी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी, सरपंच अरुणा खिलारी, उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी चेअरमन नारायणराव झावरे, व्हा. चेअरमन व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लहू जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके तसेच सर्व पालक व सदस्य ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## 'पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी' सभासदांच्या आग्रही मागणीसाठी नवीन बक्षीस योजना

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.०७, ठाणे (नवी मुंबई) :** मुंबई स्थित व महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या पुष्पक को–ऑप. क्रेडिट सोसायटी सभासदांच्या आग्रही मागणीसाठी घेऊन येत आहे. नवीन बक्षीस योजना दिनांक ३१/१२/१९९८ रोजी पुष्पक को–ऑप.क्रेडिट सोसायटी लि. ची कांजूरमार्ग, मुंबई. येथे स्थापना झाली आज संस्थेला २८ वे वर्ष चालु आहे. आज अखेर संस्थेच्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, सातारा या जिल्हयाच्या ठिकाणी संस्थेच्या २० शाखा कार्यरत आहेत. तसेच विस्तारित शाखा कोथरूड व वडुज येथे होणार आहेत. संस्थेचा ४६४ कोटी रुपये संमिश्र व्यवसाय असुन समाजातील आर्थिक वंचित घटकांना साह्य करून व सामाजिक उपक्रम राबवून सभासदांची आर्थिक परिस्थिती चांगली केली आहे. संस्था गेली १४ वर्ष झाली सभासदांसाठी विविध बक्षीस योजना राबवत आहे. मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी देखील संस्थेने 'विद्युत पुष्प ठेव योजना' सभासदांच्या आग्रही मागणीसाठी दिनांक ०३ जुलै २०२६ रोजी आणली आहे. आणि त्याला प्रतिसाद देखील चांगला भेटत आहे. सभासदांसाठी बक्षीस योजना राबवत असताना त्यांच्या मनोरंजनासाठी नाटक देखील ठेवले आहे. तरी सर्व सभासदांनी आपल्या नातेवाईक व मित्र परिवारासह यामध्ये सहभाग घ्यावा. संस्थेचे मार्गदर्शक व्ही.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे विद्यमान अध्यक्ष जी.ए.पवार, उपाध्यक्ष पी.एस. फडतरे, संचालक मंडळ, मुख्य व्यवस्थापक किरण पवार यांनी पुष्पक परिवारातील सर्व सभासदांसाठी सामजिक, सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी राबवत असतात. तसेच सभासदांनी सभासद रक्कमेमध्ये वाढ करावी व संस्थेस या तारुण्यावस्थेत जोमाने काम करण्यासाठी पाठबळ द्यावे. कर्जाचे नियमितपणे हप्ते भरावेत तसेच या 'विद्युत पुष्प ठेव' बक्षीस योजनेचा सर्वांनी लाभ घ्यावा. असे आवाहन पुष्पक को–ऑप.क्रेडिट सोसायटी यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## प्रमोशनल कॉलच्या वाढत्या त्रासावर सरकारने तातडीने उपाययोजना करावी - श्रीधर मढवी

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०७, जुईनगर (नवी मुंबई) :** मोबाईलधारकांना दिवसेंदिवस वाढत्या प्रमोशनल कॉलच्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, यावर केंद्र सरकार व संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जुईनगरचे समाजसेवक श्रीधर मढवी यांनी केली आहे. आजकाल दिवसाला ५ ते ६ किंवा त्याहून अधिक प्रमोशनल कॉल येत असल्याने नागरिक वैतागले आहेत. महत्वाच्या कामाच्या वेळी, बैठकीदरम्यान, वाहन चालवताना किंवा विश्रांती घेत असतानाही हे कॉल येत असल्याने मोठा व्यत्यय निर्माण होतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना या कॉलचा अधिक त्रास सहन करावा लागत असून, दुपारच्या विश्रांतीतही त्यांची झोपमोड होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.मोबाईलवर एखादी महत्त्वाची माहिती वाचत असताना किंवा ऑनलाइन काम सुरू असताना अचानक येणाऱ्या प्रमोशनल कॉलमुळे कामात अडथळा निर्माण होतो. अनेकदा वेगवेगळ्या क्रमांकांवरून आणि महिलांच्या नावाने कॉल येत असल्याने नागरिकांची दिशाभूल होण्याची शक्यता वाढते. एखादा क्रमांक ब्लॉक केला तरी दुसऱ्या क्रमांकावरून पुन्हा कॉल येत असल्याने या समस्येवर कायमस्वरूपी उपाय होत नाही.याबाबत प्रतिक्रिया देताना समाजसेवक श्रीधर मढवी म्हणाले, नागरिकांच्या गोपनीयतेचा आणि वेळेचा आदर राखणे आवश्यक आहे. प्रमोशनल कॉलवर कठोर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने प्रभावी धोरण राबवावे. जाहिरात करायची असल्यास त्यासाठी कंपन्यांनी स्वतः खर्च करावा. प्रत्येक प्रमोशनल कॉलवर शुल्क आकारून ते संबंधित मोबाईलधारकाच्या खात्यात टॉकटाईम किंवा इतर स्वरूपात जमा करण्याची व्यवस्था केल्यास अनावश्यक कॉलचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होईल. नागरिकांना या त्रासातून कायमची मुक्ती मिळण्यासाठी सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत.प्रमोशनल कॉलच्या वाढत्या समस्येमुळे सर्वसामान्य नागरिकांचा मौल्यवान वेळ वाया जात असून, या प्रकाराला आळा घालण्यासाठी कठोर नियमांची अंमलबजावणी करण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे.